(14)

6.2.1
NSS Register

# दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय
# मलकापूर जि.बुलडाणा

## राष्ट्रीय सेवा योजना (सत्र- २०२२-२०२३)

## वार्षिक निबंधात्मक अहवाल

१) दि. २१/०६/२०२२ रोजी जागतिक योग दिनानिमित्त महाविद्यालयात प्राणायाम व योगासने करून योग दिवस साजरा करण्यात आला.

२) दि. २६/०६/२०२२ रोजी महाविद्यालयात छत्रपती शाहू महाराज जयंती समाजिक न्याय दिन म्हणून साजरी करण्यात आली.यामध्ये सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात आला.

३) दि.१४/०७/२०२२ रोजी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण व परिसर स्वच्छता उपक्रम घेण्यात आला. वृक्षरोपना मध्ये महाविद्यालयाच्या आवारात कडुलिंब, बादाम वृक्षरोपट्यांचे रोपण केले.यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.देविदास दरेगावे व रासेयो सह कार्यक्रम कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. वृक्षारोपण व परिसर स्वच्छतेनंतर सर्व स्वयंसेवकांना चहा व नाश्ता देण्यात आला.

४) दि. ०८/०८/२०२२ रोजी हर घर तिरंगा उपक्रम राबविण्याबाबत चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले.

५) दि. १०/०८/२०२२ रोजी "हर घर तिरंगा" अभियानांतर्गत मलकापूर शहरातील तहसील चौक ते वीर शहीद संजयसिंह राजपूत यांच्या समाधी स्थळापर्यंत जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. व सर्व रासेयो स्वयंसेवकांना नाश्ता व चहा देण्यात आला.

६) दि. १४/०८/२०२२ रोजी स्वातंत्र्यदिन पूर्वतयारी म्हणून महाविद्यालयाच्या आवारात परिसर स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये ध्वजस्तंभाच्या परिसराची रासेयो स्वयंसेवकांनी स्वच्छता केली. व अल्पोपाहारानंतर उपक्रमाची सांगता करण्यात आली.

Programme Officer
N. S. S.
D. D. N. C. College of Social Work
MALKAPUR Dist. Buldana

Officiating Principal,
D D N C Social Work College,
Malkapur,Dist.Buldhana.

कार्यकारी प्राचार्य,
दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य
महाविद्यालय,मलकापूर,जि.बुलडाणा.

७) दि. १९/०८/२०२२ रोजी महाविद्यालयाच्या नजीकच्या दलित वस्तीमध्ये स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला.यामध्ये बौद्ध विहाराच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. तसेच मलविसर्जन संदर्भात जनजागृती करण्यात आली. सदर उपक्रमानंतर सर्व रासेयो स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.

८) दि. २२/०८/२०२२ रोजी रेड रिबन क्लब व रासेयो विभागामार्फत एड्स समस्येवर उपाययोजना या विषयावर चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले.यामध्ये विद्यार्थ्यांनी एड्स समस्येवर सांगोपांग चर्चा घडवून आणली.शेवटी चाहापाननंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

९) दि. ०७/०९/२०२२ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना उदबोधन वर्ग घेण्यात आला. सदर उदबोधन वर्गात रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.देविदास दरेगावे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेसंदर्भात सविस्तर माहिती दिली. शेवटी नाश्ता व चहाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

१०) दि. ०८/०९/२०२२ रोजी मलकापूर शहरातील तहसील कार्यालय व महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार ओळखपत्रासोबत आधार जोडणी कार्यक्रम घेण्यात आला.

११) दि. १६/०९/२०२२ रोजी महाविद्यालयाच्या सभागृहात रासेयो व समान संधी केंद्राच्या संयुक्त विद्यमाने अनुसूचित जाती जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या समाजकल्याण विभागाच्या योजनांविषयी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

१२) दि. २४/०९/२०२२ रोजी महाविद्यालयात रासेयो स्थापना दिवस साजरा करण्यात आला.या दिवसाच्या निमित्ताने महाविद्यालयातील वृक्षारोपण करण्यात आलेल्या वृक्षरोपठ्यांना काटेरी कुंपण घालण्यात आले. त्यानंतर सर्व रासेयो स्वयंसेवकांनी सहनास्त्याचा आनंद घेतला.

१३) दि. ३१/१०/२०२२ रोजी महाविद्यालयात सरदार वल्लभभाई पटेल जयंती व इंदिरा गांधी पुण्यथिती साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम प्रतिमापूजन करण्यात आले व महाविद्यालयाचे प्राचार्य मा.राजेंद्रसिंह दिक्षित सरांनी सरदार वल्लभभाई पटेल व इंदिरा गांधी यांच्या कार्याविषयी माहिती दिली.

Programme Officer
N. S. S.
D. D. N. C. College of Social Work
MALKAPUR, Dist. Buldana

कार्यकारी प्राचार्य,
दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाज
महाविद्यालय, मलकापूर, जि.बुलडाणा.

१४) दि. १६ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व समान संधी केंद्राच्या वतीने मलकापूर व मोताळा तालुक्यातील ११ वी व १२ वी विज्ञान शाखा असलेल्या ज्युनिअर विद्यालयातील अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांचे जाती प्रमाणपत्र पडताळणी करण्यासंदर्भात जनजागृती उपक्रमराबविण्यात आला. यामध्ये रासेयो स्वयंसेवकांनी पथनाट्य व गृह भेटीच्या माध्यमातून विध्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली.

१५) दि. ०४/१२/२०२२ रोजी महाविद्यालयाच्या रासेयो व सामाजिक न्याय विभाग बुलडाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

१६) दि.१४/१२/२०२२रोजी महाविद्यालयाच्या रासेयो व रेड रिबन कल्ब विभागाच्या वतीने एड्स सप्ताहाच्या निमित्त पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली.

१७) दि.२०/१२/२०२२ रोजी संत गाडगे बाबा यांच्या पुण्याथिती निमित्त स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला.यामध्ये दत्तक ग्रामात व महाविद्यालायच्या परिसरात स्वच्छता करण्यात आली.

१८) दि.१२/०१/२०२३ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती युवा दिन म्हणून साजरी करण्यात आली.यावेळी चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले.

१९) दि. २५/०१/२०२३ रोजी महाविद्यालयाच्या रासेयो विभागाद्वारे राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला.यावेळी विद्यार्थ्यांना आपले नाव मतदार यादीत सामाविस्ट करण्यासंदर्भात प्रोसाहित करण्यात आले.

२०) दि. ३०/०१/२०२३ रोजी महाविद्यालयात महात्मा गांधी पुण्यतिथी व हुतात्मा दिन साजरा करण्यात आला.

२१) दि.०४/०२/२०२३ रोजी रासेयो विद्यार्थी व पालक सभा आयोजित करण्यात आलेली होती.यामध्ये शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांची भूमिका व पालकांची संमती याविषयी चर्चा विनिमय करण्यात आले.

२२) दि.१९/०२/२०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम प्रतिमा पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.यावेळी प्राचार्य मा. राजेंद्रसिंह दिक्षित सरांनी छत्रपति शिवाजी महाराज यांच्या कार्याविषयी माहिती दिली.

Programme Officer
N. S. S.
D. D. N. C. College of Social Work

कार्यकारी प्राचार्य,
दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य

२३) दि. २२/०२/२०२३ रोजी संत गाडगे महाराज यांच्या दससुत्रीवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये व्याख्यान, परिसर स्वच्छता, इ.उपक्रम राबविण्यात आले.

२४) दि.२७/०२/२०२३ मलकापूर शहरातील बसस्थानक परिसरात व तहसील चौक मलकापूर येथे पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेत रासेयो विद्यार्थी सहभागी होऊन लसीकरणाचे महत्व लोकांना पटवून दिले.

२५) दि. ०२/०३/२०२३ रोजी पुस्तक प्रकाशन सोहळा पूर्वतयारी म्हणून रासेयो च्या वतीने महाविद्यालयाच्या आवारात परिसर स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला.

२६) दि.०८/०३/२०२२ रोजी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिलादिन साजरा करण्यात आला.यावेळी महाविद्यालयातील प्रा.तुलसीराम धुरंधर सरांनी भारतीय महिला सक्षमीकरनाविषयी सखोल मार्गदर्शन केले.

२७) दि.१६/०३/२०२३ रोजी दत्तक ग्राम-विवरा येथे रासेयो विद्यार्थी यांनी ग्रामाच्या पश्चिम दिशेला असलेल्या वनराई बंधाऱ्याचे काम केले.यावेळी ग्रामातील नागरिक उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S.
D. D. N. C. College of Social Work
Malkapur Dist. Buldana

कार्यकारी प्राचार्य,
दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य
महाविद्यालय,मलकापूर,जि.बुलडाणा.

b.2.1 camp

# दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय मलकापूर

## जि. बुलडाणा

## राष्ट्रीय सेवा योजना

## सत्र - २०२२ - २०२३

### रासेयो विशेष श्रमसंस्कार शिबीर निबंधात्मक अहवाल

आमच्या महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दत्तकग्राम विवरा ता. मलकापूर जि. बुलडाणा येथे दि. ०४/०२/२०२३ ते ११/०२/२०२३ या कालावधीत संपन्न झाले त्याचा अहवाल खालीलप्रमाणे

१} शनिवार दि.०४/०२/२०२३ रोजी आगमन शिबिराची पूर्वतयारी परिसर स्वच्छता व रासेयो स्वयंसेवकाची नोंदणी गावकऱ्याशी चर्चा प्रकल्पाची पाहणी व दुपारी ०४ वाजता उदघाटन समारंभ उदघाटक मा.श्री. अरविंदसिंह रामाधारसिंह राजपूत (समाजसेवक विवरा) समारंभाचे अध्यक्ष मा. राजेंद्रसिंह दीक्षित ( प्राचार्य दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय मलकापूर ) व इतर मान्यवर उपस्थित होते सायं. ०६ ते ०७ प्रार्थना व स्फूर्तीगीते तसेच रात्री ०८ ते १० सांसकृतीक कार्यक्रम.

२} रविवार दि. ०५/०२/२०२३ रोजी स. ०६ वा. प्रार्थना व योगासने स. ७:३० ते १०:३० वनराई बंधाऱ्याचे काम दुपारी बौद्धिक सत्रात मा. प्रा. नरेंद्र काळबांडे सरांनी युवकांसमोरील रोजगाराच्या संधी याविषयी रासेयो स्वंयसेवकांना माहिती दिली तसेच आमच्या संस्थेचे सचिव मा. श्री. प्रशांत खर्चे सरांनी व्यक्तिमत्व विकास याविषयी विद्यार्थ्यांसी संवाद साधला दु.०५:३० ते ०६:३० या वेळेत गावातील गरीब लोकांना फळवाटप करण्यात आले.तसेच बेटी बचाव व बेटी पढाव संदर्भात जनजागृती करण्यात आली. रात्री ०८ ते १० सांस्कृतिक कार्यक्रमात रस्तासुरक्षा अभियान, शौचालय बांधणे व इतर विषयावर नाटिका सादर केली

३} सोमवार दि. ०६/०२/२०२३ स.०६ वा. प्रार्थना व योगासने स. ७:३० ते १०:३० वनराई बंधाऱ्याचे काम दुपारी बौद्धिक सत्रात मा.प्रा.तुळशीराम धुरंधर {व्यावसाईक ग्रंथालय सहाय्यक दा.ध.ना.चौ.समाजकार्य महाविद्यालय मलकापूर} यांनी आजच्या काळात सेंद्रिय शेतीची गरज या विषयावर रासेयो स्वंसेवक व गावकरी यांना सखोल मार्गदर्शन केले. तसेच मा.प्रा.डॉ.बळवंत पाटील { सहा-प्रा श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय खडकी अकोला} यांनी ग्रामीण विकासात युवकांची भूमिका या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. सायं. ०५:३० ते ०६:३० वाजता

Officiating Principal,
D D N C Social Work College,
Malkapur,Dist.Buldhana.

दत्तक ग्रामात पाण्याचे संवर्धनपर नाटिका व रॅलीद्वारे जनजागृती केली रात्री ०८ ते १० सांस्कृतिक कार्यक्रमात नाटिका सादर केली.

४} मंगळवार दि. ०७/०२/२०२३ स.०६ वा. प्रार्थना व योगासने स.७:३० ते १०:३० वनराई बंधाऱ्याचे काम दुपारी बौद्धिक सत्रात मा.श्री.एन.के.राउत { तालुका कृषी अधिकारी,मलकापूर } यांनी तृनधाण्याचे आहारातील महत्व या विषयावर स्वंयसेवकाना व गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. सा. ०५:३० ते ०६:३० ग्रामातील दलित वस्तीला भेट देऊन शासकीय योजणांची माहिती दिली तसेच गावातील सार्वजनिक सभागृह आवाराची स्वछता केली. रात्री ०८ ते १० सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला.

५} बुधवार दि.०८/०२/२०२३ स.०६ वा. प्रार्थना व योगासने स. ७ ते ९ वनराई बंधारा व रस्तादुरुस्ती काम तसेच सकाळी ९:१५ ते दुपारी १:३० पर्यंत गोदावरी फाउंनडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या आरोग्य तपासणी शिबिरात ग्रामातील अनेक लोकांनी तपासणी करून घेतली. दुपारी बौद्धिक सत्रात मा.श्री.गजानन देशमुख { जिल्हा एड्स नियंत्रक बुलडाणा} यांनी युवक आणि एच.आय.व्ही.एड्स या विषयावर मार्गदर्शन केले तसेच शिबिरार्थी विद्यार्थी व उपस्थित गावातील लोकांची एच.आय.व्ही तपासणी केली. सायं. ०५:३० ते ०६:३० वृक्ष संवर्धन व व्यसनमुक्ती संदर्भात पथनाट्य व जनजागृती रॅली काढण्यात आली. रात्री ०८ ते १० जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला तसेच सांस्कृतिक कार्यक्रमात नाटिका सादर करण्यात आल्या.

६} गुरुवार दि. ०९/०२/२०२३ स.०६ ते ०७ प्रार्थना व योगासने तसेच स.०७:३० ते १०:३० वनराई बंधारा व रस्तादुरुस्तीचे काम करण्यात आले. दुपारी ०३ ते ०५:३० वा. बौद्धिक सत्रात मा. संजय कुमरे {शिक्षक नूतन विद्यालय मलकापूर } यांनी रस्ता सुरक्षा अभियान काळाची गरज या विषयी स्वंयसेवकांना व ग्रामस्तांना मार्गदर्शन केले सायं.५:३० ते ६:३० घरोघरी शौचालयाचा वापर यासंदर्भात ग्रामात जनजागृती रॅली काढण्यात आली. रात्री ०८ ते १० वा. पंचरंगी सांस्कृतिक मंडळाचे मा.रिजवान पटेल यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून व्यसनाधीनता,हागणदारी मुक्त गाव, स्त्री-पुरुष समानता इत्यादी सामाजिक विषयावर गावकर्यांमध्ये जनजागृती केली.

७} शुक्रवार दि. १०/०२/२०२३ स.०६ ते ०७ प्रार्थना व योगासने तसेच स.७:३० ते १०:३० वनराई बंधारा व रस्तादुरुस्तीचे काम करण्यात आले. दुपारी ०३ ते ०५:३० वा. बौद्धिक सत्रात मा.प्रा. अनिल सावळे { दा.ध.ना.चौ.समाजकार्य महाविद्यालय मलकापूर } यांनी "व्यक्तिमत्व विकास" या विषयावर मार्गदर्शन केले सायं.५:३० ते ६:३० संत साहित्याचे मानवी जीवनातील महत्व याविषयी विद्यार्थ्यांनी अभंगवाणीच्या माध्यामातून जनजागृती केली. रात्री ०८ ते १० सांस्कृतिक कार्यक्रमात नाटिका सादर करण्यात आल्या.

८} शनिवार दि. ११/०२/२०२३ स.०६ ते ०७ प्रार्थना व योगासने तसेच स.०७ ते १० दत्तक ग्रामातील परीसराची स्वच्छता करण्यात आली. स. १०:३० वा. शिबीर समारोप कार्यक्रम घेण्यात आला. या समारोप कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मा.श्री.राजेशसिंह राजपूत { सामाजिक कार्यकर्ते विवरा } अध्यक्ष मा. राजेंद्रसिंह वा. दीक्षित { प्राचार्य दा.ध.ना.चौ.समाजकार्य महाविद्यालय मलकापूर } प्रमुख उपस्थिती मा.सौ.मुक्ता तानाजी कडू {उपसरपंच} मा.नितीन पाटील {मुख्याध्यापक जी.प.केंद्रीय प्राथमिक शाळा विवरा} सोसायटी अध्यक्ष, तंटामुक्ती अध्यक्ष, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.देविदास दरेगावे व इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते तसेच या समारोपीय कार्यक्रमात मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. तसेच प्रा.आकाशसिंह राजपूत प्रा. रवींद्र पाटील. प्रा.सुरज भगत प्रा.कु.भावना बोरे प्रा.जाधव व इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवक,स्वयंसेविका उपस्थित होते. शेवटी रासेयो गीताने समारोपाची सांगता करण्यात आली.

Programme Officer
N. S. S.
D. D. N. C. College of Social Work
MALKAPUR Dist. Buldana

Officiating Principal,
D. D. N. C. College of Social Work
Malkapur; Dist. - Buldana